लोकमत दि. 23/10/2023

# चोरी लोह्यात मोबाइल सापडले उत्तर प्रदेशात; ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

लोहा : : शहरातील तीन दुकाने फोडून मोबाइल व इतर साहित्य असा दहा लाखाचा मुद्देमाल ५ एप्रिल २०२२ रोजी चोरट्यांनी चोरुन नेला होता. यातील तीन मोबाइल लोहा पोलिसांनी उत्तर प्रदेशातून हस्तगत केले.

शहरातील तुळशीराम जोरूळे, गुलाम हुसैन कुरेशी व हनमंत लांडगे या तीघांच्या मोबाइल शॉपी चोरट्यांनी एकाच रात्री फोडल्या होत्या. दुकानातील ५२ मोबाइल, १० ब्लुटुथ व नगदी रक्कम असा एकूण १० लाख ३



हजाराचा मुद्देमाल चोरून नेला . याप्रकरणी हनमंत लांडगे यांच्या तक्रारीवरुन लोहा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

त्यानंतर गुन्ह्याचा तपास करीत असताना या चोरीच्या गुन्ह्यातील मोबाईल उत्तर प्रदेशातील मेरठ जिल्ह्यात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी उत्तर प्रदेशातील किठोरा ता. मवाना येथे जाऊन आरोपीचा शोध घेतला. एका आरोपीच्या घरातून या चोरीच्या गुन्ह्यातील ६५ हजाराचे तीन मोबाईल हस्तगत केले. ही कामगिरी पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदशानाखाली पोलिस उपनिरीक्षक मंगेश नाईक, नारायण कदम, पोहेकॉ आदींनी केली. पोलिस फरार आरोपीचा शोध घेत आहेत.

5
डॉ.
नि.
यांच्या
ने रवि
माने,
बोराटे,
माधव
विलास
ंग, राजु
ी.

प्रजावाणी दि: 23/10/2023

# लोह्यात तीन अवैध दारूविक्रेत्यांवर कारवाई

लोहा, (वार्ताहर) दि. २२ : शहर व पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध दारू विक्री करणाऱ्या तीन ठिकाणी व मटका बुक्कीवर धाड टाकण्यात आली. मोटारसायकलवर फॅन्सी नंबर असलेली सात वाहने, आणि देवीच्या ठिकाणी, गरबा सुरू असताना तेथे असभ्यवर्तन करणाऱ्या पाच जणांवर कार्यवाही करण्यात आली. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व टीमने केलेल्या कार्यवाहीमुळे अवैध दारू विक्री करणारे, मटका घेणारे व सार्वजनिक ठिकाणी हुल्लडबाजी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

लोहा शहरात मटका जुगार आड्यावर कारवाई करून एका आरोपीकडून दोन मोबाईल, नगदी रुपये जप्त केले. मुंबई जुगार अधिनियम १२ अ प्रमाणे गुन्हा दाखल केला. पारडी, खडकमांजरी पानभोसी या ठिकाणी अवैध दारूची विक्री करणाऱ्या विक्रेत्यावर छापा टाकला असून तिघाजणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. सदर आरोपीकडून ४६ दारू बॉटल, हजारो रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ कलम ६५ ई प्रमाणे तीन गुन्हे दाखल करण्यात आले. सार्वजनिक ठिकाणी दुर्गा मंडळ गरबा परिसरामध्ये असभ्य वर्तन करणाऱ्या विरोधात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९४९ -अन्वये कारवाई करण्यात आली.